पोलीस अधिक्षक कार्यालय गडचिरोली
दिनांक २५.०७.२०१८

# वार्तापत्र

## विनयभंग करणा-या वनपरिक्षेत्र अधिका-यास ३ वर्षाचा कारावास

आरोपी भगवान सखाराम आत्राम, वय ४८ वर्ष दोन वर्षापुर्वी धानोरा तालुक्यात वनपरिक्षेत्र अधिकारी म्हणुन कार्यरत असताना आपले अधिपत्याखाली काम करत असणा-या महिला कर्मचारी हीस डयुटी करण्याच्या बहाण्याने स्वत:चे दुचाकीवर बसवून जंगलात नेवुन तिच्याकडे लैंगिक सुखाची मागणी करत तिला बळजबरी करून अश्लील चाळे केल्याने सदर महिलेच्या तक्रारीवरून पोस्टे धानोरा अंतर्गत पोमके मुरुमगाव येथे अप.क्र. १६/२०१६ कलम ३५४(अ), ५०६ भादंवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास पोलीस उप निरीक्षक स्वप्निल भांबरे पोमके मुरुमगाव यांनी करुन आरोपीविरुध्द दोषारोपपत्र मा.न्यायालयात दाखल केले होते.

सदर गुन्हयाचा निकाल मा. श्री एन.पी.वासाडे, न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी न्यायालय धानोरा यांनी नुकताच दिलेला असुन त्यात त्यांनी आरोपी भगवान सखाराम आत्राम यास दोषी ठरवुन त्यास ३ वर्ष कारावास व २०,०००/- रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे. मा. न्यायालयात सरकारी पक्षाची बाजु ॲड. पी.पी. हटकर यांनी मांडली. पोलीस उप निरीक्षक स्वप्निल भांबरे पोमके मुरुमगाव यांनी केलेल्या उत्कृष्ट तपासामुळेच आरोपीस शिक्षा झालेली आहे.